# टाकाऊतून टिकाऊ - देखणी कलाकृती निर्मिती स्पर्धा २०२६

**प्रयोग मालाड आयोजित**

**उपनगरातील जागरूक, पर्यावरणस्नेही, एकत्रित कुटुंब खासकरून मालाड, गोरेगाव आणि कांदिवली मधील शालेय - महाविद्यालयीन विद्यार्थी, महिलावर्ग आणि कारागीर/ कलाकार यांच्यातील कला कौशल्याला वाव देणारी अभिनव स्पर्धा**

---

**स्पर्धेचा कालावधी : १ मे ते ३० जून • पाहिली फेरी : १-१५ जुलै • अंतिम फेरी - कलाकृतीचे प्रदर्शन पारितोषिक वितरण समारंभ : १-१५ ऑगस्ट दरम्यान**

---

**भरघोस पारितोषिके, स्मृतिचिन्ह देऊन सन्मान आणि कलाकृतीला उपनगर आणि शहरात प्रसिद्धी देणारी स्पर्धा एकूण चार गटात संपन्न होणार !**

**१. शालेय विद्यार्थी, २. महाविद्यालयीन विद्यार्थी, ३. महिला वर्ग आणि ४. सर्व समावेशक खुला गट ज्यामध्ये कलाकार - तंत्रज्ञ् भाग घेऊ शकतात किंवा सर्व कुटुंब एक संघ /गट म्हणून सहभागी होऊ शकतात.**

## संस्थेचा उद्देश:

बेरोजगारी, महागाई वाढते आहे.शिक्षण आणि आरोग्य यावरील खर्चही वाढतोय.कधी अती पाऊस कधी महापूर तर कधी पाणी टंचाई आपण पाहत आलो आहोत. पण मराठी माणूस आणि खास करून मुंबईकर हार मानत नाही, खचून जात नाही. तो भविष्याची काळजी करत न बसता येणाऱ्या संकटाला सामोरे जातो, सतत कार्यरत राहतो. अशा मेहनती - सकारात्मक विचार करणाऱ्या सर्व उमदया विद्यार्थी आणि सर्व स्तरातील पुरुष व महिलांना सुवर्ण संधी!
ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरणाची हानी, बदलते हवामान याचे तडाखे आपल्या दारे खिडक्या वर बसू लागले आहेत, याला सामोरे जाऊन ते थांबविण्यासाठी शासन-प्रशासन आणि जागतिक संघटना यांच्या सूचना-मार्गदर्शन व कार्यवाहीची वाट न पाहता आता आपणच सुरुवात केली पाहिजे. या करिता घराघरातील विद्यार्थी, कुटुंब सदस्य आणि कलाकारांना प्रोत्साहन मिळावे तसेच पर्यावरणाचा समतोल राखणारी छोटीशी क्रिया आपल्या प्रत्येक कृतीतून व्यक्त करता यावी म्हणून प्रयोग मालाड संस्था आपल्या सहकार्याने " टाकाऊतून टिकाऊ देखणी कलाकृती निर्मिती स्पर्धा " आयोजित करीत आहे.
यामुळे पारंपरिक कला, कौशल्य जपून आपला आज तागायत व्यवसाय करणाऱ्या अनेक पिढ्यानंमधून आताच्या अनेक युवक - युवतींना आपली कलाकृती जोपसण्याच्या वृत्तीला जशी संधी मिळणार तसेच धकाधकीच्या आयुष्यात, असितत्वाच्या लढाई खेळत असताना; सकारात्मक विचार करत आपल्या अंगभूत कलेला जोपासणे आणि थोडी बहुत कमाई करण्याची संधी या स्पर्धेमुळे काही व्यक्ती आणि कुटुंबाना प्राप्त होणार आहे !
महान तज्ञ संशोधक स्टीफन हॉकिंग यांनी जगाला सावध करताना सुनावलं आहे, ' जर तुम्ही यंत्राच्या मागे लागून यांत्रिक बैधिकता प्रगत करीत रहाल तर मानवजातीचा विनाश होईल. ' म्हणून आपलं भविष्यच नाही तर कलासंकृतीचा वारसा जपणं, तीच संवर्धन करण हेच लक्षात घेऊन संस्थेने " टाकावू सामनातून टिकाऊ कलाकृती निर्माण " करण्यासाठी , स्थानिक होतकरू सुज्ञ विद्यार्थी, महिला, कलाकार आणि कारागीर यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेने हा स्पर्धा आयोजनाचा संकल्प सोडला आहे.

## या स्पर्धेतील घर - शाळा - महाविद्यालय - व्यवसायातील टाकाऊ वस्तू वापरण्याचे नियम व अटी :

**गट क्र. १:** या स्पर्धकांनी शालेय टाकाऊ वस्तू ( वह्या पुस्तक, रद्दी पेपर, पेन, पेन्सिल, रबर, गम ट्युब, गम बॉटल, दप्तर, स्कुल ड्रेस, शूज लेस, सॉक्स, वॉटर बॉटल ई.) वापरणे आवश्यक. या वस्तूचे आकारमान (लांबी × रुंदी ×उंची प्रमाणे ) हीं टिकाऊ कलाकृती सर्वसाधारण पणे १२ ×१२×१२ इंच पर्यंत असावी.

**गट क्र. २:** या महाविद्यालयीन स्पर्धकांनी वरील प्रमाणे साहित्य अधिक इलेक्ट्रॉनिक वेस्ट वापरावे ( मोबाईल, टॅब कव्हर, चार्जर, इलेक्ट्रिक वायर, स्क्रू ड्राइव्हर, रिमोट, बटण ई. ) हीं टिकाऊ कलाकृती सर्वसाधारण पणे १८ ×१८ ×१८ इंच पर्यंत असावी.

**गट क्र. ३:** या घरातील मुली- स्त्रिया (महिला वय वर्षे २१ आणि अधिक ) यांनी घरं कामातील टाकाऊ वस्तू (कपडेलत्ते - साड्या, ड्रेस, चादरी, टिकाऊ किचन वेस्ट, प्लास्टिक / काचेच्या बरण्या - बाटल्या ई.) हीं टिकाऊ कलाकृती सर्वसाधारण पणे २ ×२ ×२ फूट पर्यंत असावी.

**गट क्र. ४:** या खुल्या गटातील स्पर्धेतील कुटुंबातील एकसंघ / गट, वरील तीनही गटातील टाकाऊ वस्तू एकत्रितपणे वापरून एक टिकाऊ देखणी कलाकृती बनवू शकतात.
तसेच खुल्या गटातील कलावंत, कारागीर, तंत्रज्ञ् टाकाऊ लाकूड सामान, लोखंड, अलुमिनिम, काचा, प्लास्टिक, सायकल, बाईक, कार यांचे स्पेअर पार्टस वापरून देखणी कलाकृती बनवू शकतात. हीं टिकाऊ कलाकृती सर्वसाधारण पणे २.६×२.६ ×२.६ (अडीच फूट ) पर्यंत असावी.

## प्रवेश अर्ज, प्रवेश शुल्क, स्पर्धेतील सहभागाबाबत आणि स्पर्धेचे स्वरूप:

* आम्ही ऑनलाईन दिलेल्या अर्जाचा प्रिंटाऊट घेऊन तो पूर्ण भरून स्वतःचें छायाचित्र लावून ,त्या अर्जाचा फोटो काढून तो १५ एप्रिल ते १ मे दरम्यान आमच्या ईमेलवर पाठवायचा आहे. त्यावेळी सोबत दिलेल्या क्यू आर कोडं द्वारे प्रवेश शुल्क भरायचं आहे.

## स्पर्धा प्रवेश शुल्क:

*** गट १- ५ ते १०वीचे विद्यार्थी:** रू.५०/- *** गट २- महाविद्यालयीन विद्यार्थी:** रू १००/- *** गट ३- २१ वर्षांवरील मुली/ गृहिणी:** रू. २००/- *** गट ४ - खुला वर्ग - पदवीधर, इंजिनियर, डॉक्टर, मेकॅनिक, सुतार, वेल्डर ई.पैकी कुणीही दोन व्यक्तींसह एक गट:** रू. ५००/- **अथवा एक संपूर्ण कुटुंब मिळून एक गट:** रू. ५००/- (या कुटुंब गटाला शालेय - महाविद्यालयीन विदयार्थी आणि २१ वर्षावरील मुली / गृहिणी यांना वर निर्देशीत टाकाऊ सामान वापरणे बंधनकारक ) (प्रत्येक गटात कमीत कमी २०, जास्तीत जास्त ४० स्पर्धक अपेक्षित.कमी स्पर्धक आल्यास स्पर्धा रद्द करण्यात येईल)

* अर्जात माहिती भरल्याप्रमाणे आपण जे साहित्य गोळा केले आहे त्याचा एक तपशीलासह २ ते ३ मी. व्हिडीओ, १० मे पर्यंत पाठविणे आवश्यक.

* आपण कुटुंब किंवा मित्र परिवारातील कुणा एक दोन सदस्यांसह कलाकृती निर्मितीचे २ मी. ३/४ विडिओ ३१ मे पर्यन्त पाठविणे आवश्यक.

* आणि अंतिम कलाकृतीवर स्वतः चें नावं आणि गटाचे स्टिकर लावून ३/४ मी. व्हिडीओ जो चारही अंगाने चित्रण करून, पूर्ण तपशील कथन करून १५ जून पर्यंत आमच्या मेल वर पाठवणे बंधनकारक आहे.

* आपण पाठविलेल्या एकत्रित विडिओज मधून प्रत्येक गटातून १० कलाकृती १ ते १५ जुलै दरम्यान प्रथम फेरीत निवडल्या जातील. आशा सर्व ४० कलाकृतीना रूपये एक हजाराचा पुरस्कार दिला जाईल.

* या विजेत्या कलाकृतीचे १-१५ ऑगस्ट दरम्यान दोन दिवस प्रदर्शन आयोजित केले जाईल, याकरिता त्याची आपण काळजी घेणे आवश्यक आहे. याच काळात पारितोषिक वितरण समारंभ पार पडेल तेंव्हा कुटुंब आणि मित्र परिवारासह आपण उपस्थित राहणे आवश्यक.

## पारितोषिक - पुरस्कार योजना:

* अंतिम स्पर्धेकरता प्रत्येक गटातून १० कलाकृती निवडणार त्यांना प्रत्येकी ₹ १ हजार पुरस्कार

* अशा ४० कलाकृतींचे २ दिवस प्रदर्शन. या काळात लोकांच्या पसंतीस उतरणाऱ्या प्रत्येक गटातील ३ आशा १२ कलाकृतींना रू. दोन हजार उतेजनार्थ पारितोषिके देऊन सन्मान केला जाईल.

* इतर विद्यार्थी आणि कलाकारांना, काही हौशी कलाकारांना यातून रोजगार निर्मितीचे साधन उत्पन्न होण्यासाठी स्पर्धेतून प्रेरणा मिळावी या करता प्रत्येक गटातून पाहिल्या तीन येणाऱ्या कलाकृती मालाड मधील सुप्रसिद्ध शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, महापालिका / बँक कार्यालय अथवा उद्योगसमूह, हॉल किंवा मोठ्या गृह संकुल / सोसायटीला ठराविक मूल्य घेऊन भेट देणार जेणे करून सदर कलाकृती ते त्यांच्या गेटवर/ प्रथम दर्शनी भागात प्रस्थापित करून आपल्या उद्देशाची जनजागृती करतील. ( प्रत्येक कलाकृतीवर कायम स्वरुपी संस्था, स्पर्धकांचे नाव छापले जाईल याची दक्षता घेतली जाईल.)

## पारितोषिक तपाशील:

*** गट ४. खुला गट ( व्यावसायिक,कलाकार, तंत्रज्ञ् अथवा कुटुंब सदस्य एक गट )**
*** प्रथम पारितोषिक - ₹ २५ हजार * द्वितीय पारितोषिक - ₹ १५ हजार * तृतिय पारितोषिक - ₹ १० हजार**

*** गट क्र.३ (२१ वर्षांवरील मुली/ गृहिणी)**
*** प्रथम पारितोषिक - ₹ २० हजार * द्वितीय पारितोषिक - ₹ १२ हजार * तृतिय पारितोषिक - ₹ ०८ हजार**

*** गट २ (महाविद्यालयीन विद्यार्थी)**
*** प्रथम पारितोषिक - ₹ १० हजार * द्वितीय पारितोषिक - ₹ ०६ हजार * तृतिय पारितोषिक - ₹ ०३ हजार**

***गट क्र. १ ( ५ ते १० कक्षेतील शालेय विद्यार्थी )**
*** प्रथम पारितोषिक - ₹ ०५ हजार * द्वितीय पारितोषिक - ₹ ०४ हजार * तृतिय पारितोषिक - ₹ ०३ हजार**

## अत्यंत महत्वाचे:

**स्पर्धेचे आयोजन, वेळा पत्रक, अटी नियम यात बदल अथवा स्पर्धा रद्द करण्याचे सर्व हक्क संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या आधीन आहेत याची सर्वांनी नोंद घ्यावी हीं विंनती.**

**(सोशल मीडियावर अनेक नामवंत शिल्पकार तसेच हौशी कलाकारांचे रिल्स, मुलाखती उपलब्ध आहेत. आपण त्या आवर्जून पहा. त्यातून टाकाऊ पण टिकाऊ देखण्या भेटवस्तू, शिल्प, भिंतीवर टांगायच्या विविध तसबीरी कशा बनविल्या जातात याची उत्तम माहिती मिळेल. याचा संदर्भ म्हणून वापर करा, पण आपल्याला दिलेल्या आकारमानात पाचही दिशांनी नीट निरखून पाहता येईल अशी आपल्या तल्लख बुद्धीने, कल्पकतेने देखणी शिल्पकृती बनवा.)**

---


## अधिक माहितीसाठी :

**संपर्क: ८९८८९८१९१९ • व्हॉटस् अॅप: ९३७२०३१९१९**

**ई-मेल: prayogcompmalad@gmail.com • वेबसाईट: www.prayogmalad.org**

# FROM WASTE TO BEAUTIFUL ART COMPETITION 2026

**Prayog Malad, a socially conscious organization, is organizing an innovative competition to promote environmental awarenesand and bring community together to showcase the artistic talents of students, women, and artisans from specificaly Malad, Goregaon, and Kandivali as well as from Mumbai City.**

## Competition Details:

**• Duration: May 1 to June 30, 2026 • Preliminary Round: July 1-15, 2026 • Final Round: August 1-15, 2026 • Prizes: Cash awards, trophies & certificates**

## Objective:

The objective of this competition is to encourage the use of recyclable materials, reduce waste, and promote sustainable living. The competition aims to provide a platform for participants to showcase their creativity and skills while contributing to environmental conservation.

## Categories:

1. School Students (5th to 10th standard) 2. College Students 3. Women (above 21 years)
4. Open Category (artists, artisans, and family as a one group)

## Rules and Regulations:

- Participants must use recyclable materials as specified for each category.
- The artwork should not exceed the specified dimensions.

• **Group 1:** 12"×12"×12" • **Group 2:** 18"×18"×18" • **Group 3 :** 24"×24"×24"
• **Group4:** 30"×30"×30"

- Participants must submit a video showcasing their artwork and a brief description.
- The decision of the judges will be final.

## Prizes:

- **In Preliminary Round of Each Category:** 10 winners will receive Rs. 1,000 each
- **In Final Round  Best 3 in each category:** Rs. 2,000 each

**- Open Category:**
**Artisans or Family Group**
• First Prize: Rs. 25,000 • Second Prize: Rs. 15,000 • Third Prize: Rs. 10,000

**- Homemakers /Women Category:**
• First Prize: Rs. 20,000 • Second Prize: Rs. 12,000 • Third Prize: Rs. 8,000

**- College Students Category:**
• First Prize: Rs. 10,000

## About the Competition:

The "Takaau to Tikau-Dekhni Kalakruti Nirmiti Spardha 2026" is an innovative competition organized by PRAYOG MALAD to promote environmental sustainability and encourage creativity among students, women, and artists in Mumbai suburb & city area. The competition aims to utilize waste materials and create durable and decorative art pieces.

## Rules and Regulations:

- Participants must use waste materials as specified for each category.
- The size of the art piece should not exceed the specified dimensions.
- Participants must submit a video of the art piece and a detailed description.
- The art piece should be original and not copied from any source.

## Prizes:

- **Category 1:**
  **Rs. 5,000, Rs. 4,000, and Rs. 3,000 for 1st, 2nd, and 3rd prizes respectively**
- **Category 2:**
  **Rs. 10,000, Rs. 6,000, and Rs. 3,000 for 1st, 2nd, and 3rd prizes respectively**
- **Category 3:**
  **Rs. 20,000, Rs. 12,000, and Rs. 8,000 for 1st, 2nd, and 3rd prizes respectively**
- **Category 4:**
  **Rs. 25,000, Rs. 15,000, and Rs. 10,000 for 1st, 2nd, and 3rd prizes respectively**

**Registration:**

- Registration starts from : 15th April 2026
- Last date for registration : 1st May 2026

**Registration fee:**

- **Category 1: Rs. 50**
- **Category 2: Rs. 100**
- **Category 3: Rs. 200**
- **Category 4: Rs. 500 (for individuals or family)**

**Please note that the organizers reserve the right to change the rules and regulations, competition schedule, or cancel the competition if necessary.**

(On Social Media various interviews, reels n some workshops are available regarding Reuse - Recycling of housewaste products. Some artisans are famous for durable n Decorative Crafts made out wast materials. They have synchronized various materials to create Attractive n Durable wall hangings n Sculptures n frames. You gothru it to create your own Craft. Don't repeat it. Take a reference n with your imagination and knowledge try to make a Creative 3D image in specified scale.)

---

**For more information:**

**Contact: 8988981919 • Whats App: 9372031919**

**Email: prayogcompmalad@gmail.com • Website: www.prayogmalad.org**